# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## राष्ट्रीय सेवा योजना

गणेशखिंड, पुणे – ४११ ००७

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

प्रो. (डॉ.) सदानंद भोसले

एम्.ए., पीएच् डी.

**संचालक** (अतिरिक्त कार्यभार)

कार्यालय क्र. : ०२०–२५६२२६८८/८९
: ०२०–२५६२२६९०/९१
: ०२०–२५६२२६९२
: ०२०–२५६९७३४१


संदर्भ : रासेयो/२०२४–२५/३१२ दि. ०८/११/२०२४

प्रति,
मा.प्राचार्य/संचालक,
रासेयो संलग्नित सर्व महाविद्यालये परिसंस्था,
पुणे, अहमदनगर व नाशिक जिल्हा,
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ.

विषय : 'राष्ट्रीय सेवा योजनेमार्फत मतदान जनजागृती अभियान राबविणेबाबत'

महोदय,

मा. राज्यसंपर्क अधिकारी, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, रासेयो, मंत्रालय, मुंबई यांच्या निर्देशानुसार राज्यात दि. २० नोव्हेंबर २०२४ रोजी होत असलेल्या विधानसभा सार्वत्रिक निवडणूकीत राज्यातील मतदारांच्या मतदानातील टक्केवारीच्या प्रमाणात वाढ होण्याच्या अनुषंगाने आपल्या महाविद्यालयातील रासेयो स्वयंसेवकांमार्फत मतदारांना निवडणूक प्रक्रियेमध्ये सहभागी करून घेण्याच्या दृष्टीने मतदान जनजागृती अभियान राबविण्यात यावे.

मा. मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना सहकार्य करण्याकरिता राष्ट्रीय सेवा योजना नियमित कार्यक्रम आणि शिबिरातंर्गत मतदान जागृतीसाठी विविध उपक्रम राबविण्यात यावेत. त्यानुसार आपल्या महाविद्यालयात व महाविद्यालय परिसरात जास्तीत जास्त नाविन्यपूर्ण पध्दतीने जनजागृती, प्रसार–प्रचार करून मतदान जागृतीस्तव पथनाट्य, रॅली, फ्लेक्स इ. प्रभावी साधनांचा वापर करण्यात यावा. तसेच फ्लेक्सवरती My Bharat बोधचिन्ह (लोगो) दर्शनीभागावर घ्यावा. नागरिकांचा मतदान प्रक्रियेत जास्तीत जास्त सहभाग वाढावा यासाठीच्या उपाययोजना राष्ट्रीय सेवा योजनेमार्फत करण्यात याव्यात.

नागरिकांमध्ये मतदान विषयक जनजागृती करण्यासाठी स्वीप कार्यक्रम राबविण्यात येतो. त्यानुषंगाने सदर स्वीप कार्यक्रमातर्गत आपल्या महाविद्यालयामधील निवडणूक साक्षरता मंडळाचे सक्षमीकरण करून त्याद्वारे मतदान विषयक उपक्रम राबविण्यात यावेत. त्यानुसार रासेयो स्वयंसेवकांमार्फत उपक्रमांचे आयोजन करून या उपक्रमाना ट्विटर, फेसबुक, व्हाट्सॲप व इतर सोशल मिडीयाच्या माध्यमातून प्रसिध्दी द्यावी. तसेच राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांची माहिती My Bharat पोर्टलवर Event Create करून अपलोड करण्यात यावे. या उपक्रमाचा सविस्तर अहवाल व छायाचित्रे nssrcpune@gmail.com व nss_student_list@pun.unipune.acin या मेलवर "२०२४–विधानसभा सार्वत्रिक निवडणूका" या विषयासह पाठवावा. कळावे, ही विनंती.

संचालक
राष्ट्रीय सेवा योजना

सोबत : मा. राज्यसंपर्क अधिकारी, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, रासेयो, मंत्रालय, मुंबई यांचे पत्र

**महाराष्ट्र शासन**

**उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय.**

एलफिन्स्टन तंत्र विद्यालय परिसर, ३, महापालिका मार्ग, धोबी तलाव, मुंबई-400 001.

ई-मेल- nssmantralaya@gmail.com दूरध्वनी क्र.022-22679565

**तात्काळ**

क्रमांक:रासेयो-2023/प्र.क्र.186/रासेयो कक्षदिनांक: 08 नोव्हेंबर, 202४

**प्रति,**

**कार्यक्रम समन्वयक तथा संचालक**

**राष्ट्रीय सेवा योजना,**

**सर्व विद्यापीठ/संचालनालये**

**विषय :-<u>राष्ट्रीय सेवा योजनेमार्फत मतदानजनजागृती अभियान राबविणे बाबत.</u>**

उपरोक्त विषयानूसार राज्यात दिनांक 20 नोव्हेंबर, 2024 रोजी होत असलेल्या विधानसभा सार्वत्रिक निवडणूकीत राज्यातील मतदारांच्या मतदानातील टक्केवारीच्या प्रमाणात वाढ होण्याच्या अनुषंगाने आपल्या विद्यापीठातर्गंत महाविद्यालयातील रासेयो स्वयंसेवकांमार्फत मतदारांना निवडणूक प्रक्रियेत सहभागी करुन घेण्याच्या दृष्टीने मतदान जनजागृती अभियान राबविण्याबाबत आपल्यास्तरावरुन योग्यती कार्यवाही करण्यात यावी.

मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना सहकार्यास्तव राष्ट्रीय सेवा योजना शिबिरातंर्गत मतदान जागृतीसाठी विविध उपक्रम राबविण्यात यावेत. आपल्या विद्यापीठातर्गत महाविद्यालय व महाविद्यालया बाहेरील परिसरात जास्तीत जास्त नाविन्यपूर्ण पध्दतीने जनजागृती, प्रसार-प्रचार करण्यात यावा. चौकाचौकात मतदान जागृतीस्तव पथनाटय, रॅली, फ्लेक्स इ. प्रभावी साधनांचा वापरकरण्यात यावा.बॅनर, फ्लेक्सवरMY BHARAT PORTAL चा LOGOदर्शनीभागावर प्रिंन्ट करावा.नागरिकांचा मतदान प्रक्रियेत जास्तीत जास्त सहभाग वाढावा यासाठीच्या उपाययोजना राष्ट्रीय सेवा योजनेमार्फत करण्यात याव्यात.

नागरिकांमध्ये मतदान विषयक जनजागृती करण्यासाठी स्वीपSVEEP (SystematicVoter's Education and Electoral Participation) कार्यक्रम राबविण्यात येतो.त्यानुषंगाने सदर स्वीप कार्यक्रमातर्गत राज्यातील सर्व रासेयो संलग्न विद्यापीठ/महाविद्यालया मधील निवडणूक साक्षरता मंडळाचे सक्षमीकरण करुन त्याव्दारे मतदान विषयक उपक्रम राबविण्यात यावेत. मतदान जागृती विषयक सर्वउपक्रमांची MY BHARAT PORTAL वर नोंद घेणे क्रमप्राप्त असेल.जनजागृतीसाठी केलेल्या कृतीचे विविध प्रकारचे फोटो तसेच प्रत्येक कृती MY BHARAT PORTAL वर अपलोड करण्यात यावी. रासेयो संलग्न विद्यापीठाने मतदान जनजागृतीसाठी केलेल्या सर्व प्रत्यनांचे संकलन एक ते दोन मिनिटांपर्यतच्या व्हिडीओमध्ये करुन सदर व्हिडीओ MY BHARAT PORTAL वर अपलोड करावा. याबाबत आपणाकडून करण्यात आलेल्या कार्यवाहीचा अहवाल रासेयो क्षेत्रिय संचालक पुणे व या कार्यालयास तात्काळ सादर करण्यात यावा.

**(डॉ. निलेश पाठक)**

राज्यसंपर्कअधिकारी / विशेषकार्यअधिकारी

रासेयो कक्ष,मंत्रालय,मुंबई